MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



पीआय अशोक मुदिराज यांच्या विरोधात बीडचे अतिरिक्त पोलीसअधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे लेखी तक्रार
एस पी साहेब पीआय अशोक मुदिराज यांना कोणाचा आशीर्वाद आहे महिलांवर पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अत्याचार प्रकरणात मुदीराज तडजोडीचे राजकारण करतात?
पीआय अशोक मुदिराज यांनी संबंधित महिलेस ३० हजाराची मागणी केली पत्रकार अंगद मोहिते यांनी लेखी तक्रारीत केला उल्लेख?
पत्रकार अंगद मोहितेंनी पि आय अशोक मुदिराजांना सांगितले की तीनशे रुपये रोजाने कामाला जाणारी महिला तीस हजार कुठून देणार?
पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज यांना कोणाचे अभय?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३११ | शनिवार दि.०३ ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -311 | SATURDAY DT.03 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मुदिराजचा आणखी एक कारनामा, चक्क पत्रकारालाच कपडे काढायला लावले

## वर्दी अंगावर आली की मुदिराजचा मुजोरपणा वाढला का?

## भ्रष्टाचाराची सवय लागलेला मुदिराज कोंबड्यासुध्दा हप्त्याने आणत असेल?

## मुदिराजच्या अघळ पघळ कारभाराचा ओघळ एस.पी.ऑफिसपर्यंत!

## मुदिराजला पेठ बीडच्या गुन्ह्याची नाही खबर पण वाटणीला बरोबर!

बीड – पेठ बीड पोलीस ठाणे हे भ्रष्टाचाराचे माहेरघर बनले असून या ठिकाणी न्याय मागणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तीचे सुद्धा अंगावरचे कपडे काढून घेण्याचा प्रकार पोलिसांकडून होत आहे यामध्ये सामान्य गोरगरीब नागरिकांना त्रास सहन करावा लागत असतानाच आता तर चक्क पत्रकाराच्या अंगावरचे कपडे काढण्यातच पेठ पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज हे आपली दादागिरी दाखवून वर्दीचा गैरफायदा घेत आहेत त्यांच्या विरोधात लेखी तक्रार पत्रकार अंगत मोहिते यांनी केली आहे.

पेठ बीड पोलीस ठाण्याचे पी आय अशोक मुदिराज यांनी पंधरा दिवस आधी पेठ बीड पोलीस ठाण्यात पत्रकार अंगद मोहिते गेले असताना माहिती विचारण्यासाठी गेले असता पि आय अशोक मुदिराज यांना दिवसभरात घडलेली माहिती हि यावेळी पत्रकार अंगद मोहिते यांनी विचारली असता चक्क पेठ बीड पोलीस ठाण्याचे पि आय अशोक मुदिराज साहेबांनी त्याच्या कॅबिनच्या बाजूला असलेल्या व सीसी टी व्ही कैमरा नसलेल्या रूममध्ये नेऊन पत्रकार अंगद मोहितेच्या अगावरी पॅन्ट शर्ट काढून उभा केल व अपमानास्पद वागणूक देत शिविगाळ केली तुला कशाची माहिती द्यायची तु कोण आहेस तुझ्यासारखे दररोज शंभर येतात जातात यानंतर तू माझ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये दिसायचे नाही अन्यथा तुझ्यावर गुन्हा दाखल करून तुला आत मध्ये टाकेल असा दम दिला.

पत्रकार संपादक स्वराज्य न्यूज २४ महाराष्ट्र अंगद मोहिते यांनी १५ दिवसानंतर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे लिखित तक्रार द्वारे पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराजांवर कारवाईकाठी मागणी केली आहे. व तशी लेखी तक्रार दिल्यानंतर पत्रकार अंगत मोहिते यांनी सांगितले की मी गेल्या पंधरा दिवसांपूर्वी प्रचंड तणावात होतो आत्महत्या करण्याचे मनात विचार येत होते परंतु पत्रकार बांधवांनी माझी समजूत काढली व त्यानंतर मी संबंधित प्रकरणास वाचा फोडून न्याय मिळावा म्हणून बीडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडे लेखी तक्रार केलेली आहे.

दिनांक १८ साथ २०२४ वेळ सकाळी दहा ते चार वाजेपर्यंत चे पेठ बीड पोलीस ठाणे तील या दिवसाची सर्व सिस्टीम कॅमेरे चेक करून त्यामध्ये संबंधित सत्य बाहेर येईल व माझे कपडे पि आय अशोक मुदिराज यांनी कुठल्या अधिकाराने माझे कपडे काढले याची सखोल चौकशी करून तात्काळ पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज यांच्यावरती गुन्हा दाखल व्हावा व त्यांना तात्काळ निलंबित करावे अशी मागणी यावेळी पत्रकार संपादक स्वराज्य न्यूज २४ चे अंगत मोहिते यांनी यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे?

अशोक मुदिराज यांच्याविरुद्ध पत्रकार संपादक स्वराज्य न्यूज २४ महाराष्ट्र चे अंगत मोहितेनी बीडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या कडे लेखी तक्रार भेट घेऊन दिली आहे.

संबंधित बीड शहरातील बार्शी नाका परिसरातील एका विधवा महिलेची मदत करण्यासाठी मोहिते हे गेले होते स्वराज्य न्यूज २४ महाराष्ट्राचे संपादक अंगद मोहिते यांनी सांगितले की बार्शी नाका परिसरातील रहिवासी असलेली एक विधवा महिलांच्या तक्रारीचे विचारना करण्यासाठी मी गेलो होतो संबंधित विचारणा केल्यानंतर मी त्यांना सांगितले की महिलेचा विषय काय आहे तर त्यांनी महिलेला ३० हजार रुपयाची लाच मागितली होती व तो पोलीस कर्मचारी व पेठ बीड ठाण्याचे अशोक मुदिराज यांनी मला त्या ठिकाणी अरेरावी भाषा सुरू केली व त्यानंतर पि आय अशोक मुदिराज यांना मी सांगितले की संबंधित महिला ही विधवा आहे. तीनशे रुपये रोजाने कामाला जात आहे ती ३० हजार कसे देईल साहेब काहीतरी करावं त्या महिलेला न्याय द्या संबंधित महिलेच्या प्लॉट वरती एक टपरी चालकांने कब्जा मारला होता. तो कब्जा उठवण्यासाठी त्या महिलेने पेठ बीड पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. पत्रकार यावेळी विधवा महिला

- पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज व त्यांचे कर्मचारी हे आर्थिक तडजोडी मध्ये पोलीस स्टेशन चालवत आहेत का?
- पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज यांनी पेठबीड हद्दी मध्ये नंगानाच चालवला आहे?
- पि आय अशोक मुदिराजनी मागितली तीस हजाराची लाच पत्रकारांनी विचारणा केली असता काढले पत्रकाराचे कपडे काढून व अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे पि आय अशोक मुदिराजविरोधी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे लेखी तक्रार.?
- संपादक स्वराज्य न्यूज २४ महाराष्ट्र चे अंगद मोहिते यांना दिली अपमानास्पद वागणूक?
- बीड जिल्ह्यामध्ये महिला वरील अत्याचार वाढले पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे?
- पेठ बीड ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज यांनी पत्रकारास दिली अपमानास्पद वागणूक?
- बार्शी नाका परिसरातील विधवा महिलेच्या जागेवरील ताब्याच्या विरोधात तक्रार देणाऱ्या महिलेला मदत करण्यासाठी गेले होते संबंधित पत्रकार अंगद मोहिते?
- विधवा महिलेच्या प्लॉटवर कब्जा केला होता एका टपरी चालकाने त्याच्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी गेलेल्या महिलेला पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज मागितले ३०००० हजार लेखी तक्रारीत पत्रकार अंगत मोहिते यांनी केला उल्लेख ?
- बार्शी नाका परिसरातील एका विधवा महिलेच्या प्लॉटवर एका टपरी चालकाने कब्जा मारला होता त्याबद्दल महिलेने दिली होती तक्रार?
- प्रचंड तणावात असलेल्या पत्रकार अंगत मोहिते आत्महत्या करण्याच्या विचारात होते?
- अंगद मोहिते यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांना सांगितली हकिगत की मी प्रचंड तणावात असताना जीवन संपविण्याचा विचार मनात येत होता?
- न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण पोलीस अधीक्षकांच्या दालणात बसेल – अंगत मोहिते

सोबत मदतीसाठी गेलेले पत्रकारांच्या मोहिते यांनी संबंधित पोलीस अधिकारी असलेले फुल खाण्याचे पीआय अशोक मुदिराज यांना व पोलीस कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता यांना संबंधित प्रकरणास तीस हजार रुपयाची लाच त्यांनी मागितली यावरून पत्रकार ही व पि आय मुदिराज यांनी पत्रकाराला आपल्या केबिनच्या बाजूला असलेल्या जिथ सी सी फुटेचे कॅमेरे नाहीत त्या ठिकाणी बाजूच्या रूममध्ये नेत पत्रकाराचे कपडे काढून अपमानास्पद वागणूक दिली. पि आय अशोक मुदिराज यांनी पत्रकार चे कपडे काढले व शिवीगाळ करून पेठ बीड ठाण्याच्या बाहेर हाकलून दिले पण पि आय अशोक मुदिराज यांना पत्रकारांचे कपडे काढून काय मिळणार अशी चर्चा सध्या बीड शहरामध्ये चालू आहे? अशोक मुदिराजांचा पाठीराखा कोण आहे हे एवढी दादागिरी करायला अशोक मंदिराज तयार कसे काय होतात. पि आय अशोक मुदिराज यांची अरेरवी व मी पणा व भ्रष्टाचाराचा कळस पेठ बीड पोलिसांचा जनतेच्या डोळ्यादेखत दिसत आहे. आणि गुन्हेगार माफिया यांच्याशी पेठ बीड ठाण्याच्या हद्दीमध्ये पोलिसांचे अर्थपूर्ण संबंध स्पष्टपणे दिसून येत असतानाच मात्र यावेळी अशोक मुदिराजांनी आता आपल्या अकलेचे तारे तोडून पत्रकाराचे कपडे काढण्यात त्यांना रस आहे का अशी चर्चा सध्या जोर धरू लागली आहे?

परंतु यावेळी अनेक महिलांवरती पेड बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये अन्याय अत्याचार होत असताना पेठ पोलीस गप्प राहण्याची भूमिका घेत आहे. अशोक मुदिराज यांच्या पाठीशी नेमका कोणाचा आशीर्वाद आहे हेच जनतेला कळेनासे झाले आहे.?

# राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या उपस्थितीत पिंपरी मध्ये डिजिटल मीडिया परिषदेची राज्यस्तरीय बैठक

## मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स व्दारे साधला संवाद
## पुण्यात होणार पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा

पिंपरी चिंचवड ।प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या आदेशानुसार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेची राज्यस्तरीय बैठक राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष सनी शिंदे यांच्या उपस्थितीत नुकतीच पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे पार पडली.या बैठकीत पुण्यात डिजिटल मीडिया परिषदेची पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा होणार असून याबाबत पुणे जिल्हा पदाधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या आदेशानुसार पुण्यात डिजिटल मीडिया परिषदेची राज्यस्तरीय बैठक राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे तसेच राज्य उपाध्यक्ष संतोष शिंदे यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशी, महिला पत्रकार श्रावणी कामत, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले, कार्याध्यक्ष अविनाश आदक, उपाध्यक्ष सुरज साळवे, संतोष गोतावळे,महावीर जाधव, रामकुमार शेंडगे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. बैठकीमध्ये लंडन वरून मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स व्दारे राज्यातील पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. राज्यस्तरीय कार्यशाळेची रुपरेषा त्यांनी जाणुन घेत योग्य त्या सूचना दिल्या.

यावेळी राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की डिजिटल मिडिया परिषदेची पहिली राज्यस्तरीय कार्यशाळा पुण्यात होणार असून ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वाची आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडियाच्या या विंग मध्ये यु ट्युब आणि पोर्टल चे संपादक, उपसंपादक, पत्रकार यांना सामावून घेत त्यांच्या मुलभूत प्रश्नांची सोडवणूक कशी केली जाते हे देखील समजावुन सांगण्यासाठी ही महत्त्वाची कार्यशाळा आहे. राज्यातील प्रसिद्ध तज्ञांचे मार्गदर्शन या कार्यशाळेत लाभणार आहे. यु ट्यूब व पोर्टल च्या माध्यमातून जाहिराती व आर्थिक स्थितीची माहिती या कार्यशाळेतुन मिळणार आहे. खरंतर मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मुख्य विश्वस्त एस एम देशमुख हे राज्यातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर असतात.मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख,विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस शेख मन्सुरभाई, कोषाध्यक्ष विजय जोशी हे सर्वजण निश्चितच आपल्या सर्वांच्या हक्कांच्या मागण्यांसाठी कायम आपल्या सोबत असतात. राज्यभरातील यु ट्यूब आणि



पोर्टल, चे संपादक,उपसंपादक, पत्रकार हे या राज्यस्तरीय कार्यशाळेला जास्तीत जास्त संख्येने कसे उपस्थित राहतील यासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हा व तालुक्यांच्या नोंदी घेणे गरजेचे असल्याचे मत ही राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले.

तर राज्य उपाध्यक्ष संतोष शिंदे यांनी यु ट्युब आणि पोर्टल च्या संपादक, उपसंपादक व पत्रकार यांच्या अडचणीचा पाढा वाचला. यातुन अडचणीतून मुक्त होण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे दारे आपल्यासाठी सदैव खुले आहेत. डिजिटल मिडिया परिषदेचे अधिकृत आणि कायम सदस्यत्व मिळवण्यासाठी त्याचे निकष समजावून घेण्याबरोबरच आपल्या हक्काच्या मेहनतीच्या मागण्या मान्य कशा पद्धतीने केल्या जातील हेच या कार्यशाळेच्या माध्यमातून कळणार आहे. पुण्यात होणाऱ्या कार्यशाळेत डिजिटल मीडिया परिषदेची माहिती पुस्तिका असणार आहे. नियमितपणे काम करणाऱ्या पत्रकारांना अडचणीचा सामना कसा करावा लागतो. वाईट गोष्टींना आळा बसणे आणि पत्रकारांच्या सकारात्मक व नकारात्मकतेवर राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन मिळणार असल्याचे उपाध्यक्ष संतोष शिंदे यांनी सांगितले.

# अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

संत शिरोमणी सावता महाराज समाधी उत्सव सोहळ्यानिमीत्त येथील संत सावता महाराज मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता रविवारी पंढरपुर येथील जगन्नाथ देशमुख यांच्या उपस्थितीत ह.भ.प.अच्युत महाराज जोशी यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार आहे या सप्ताहात काकडा भजन, विष्णु सहस्त्रनाम, गाथा भजन श्री संत सावता महाराज चरित्र वाचन, हरिकिर्तन, हरिजागर असे कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी अमोल घोडके, बालासाहेब कुलकर्णी, दशरथ कदम,पद्माकर महामुनी, दिलीप भांगडिया,व्यंकटेश दिंडोरे, दत्ता माले, रामकृष्ण माळी, बनेश्वर यादव, राजाभाऊ धायगुडे,नाना जगताप, दशरथ कदम, ज्ञानोबा डोंगरे, बालासाहेब विखे पाटील,मुकुंद पवार, हिंदूलाल साखरे, बालू गडदे, माधव सांगोले आकाश पाटील, हरिदास बामणे, किशोर इरलापले, बाळू जिरे योगेश करपुडे, शिवाजी पांचाळ, गणेश आढाव आदित्य यादव,आद्यकवी मुकूंदराज वारकरी शिक्षण संस्था गोविंद महाराज व रेवले महाराज यांच्यासह अनेकजण परिश्रम घेत आहेत.



# गढी महाविद्यालयात सु-जोक थेरेपी कार्यशाळा संपन्न

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे वाणिज्य विभाग,राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आरोग्य समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सु-जोक थेरेपी या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून नायगरा हेल्थ केअर सेंटर मुंबई येथील डॉ.युगंधर नारकर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रोफे. डॉ. रामहरी फाटक हे उपस्थित होते. सर्वप्रथम प्रोफे. डॉ. रामहरी फाटक यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. युगंधर नारकर यांनी असे प्रतिपादन केले की सध्या विज्ञान आणि इंटरनेटच्या युगामध्ये व्यक्तीचे जीवन अत्यंत धावपळीचे झाले आहे. तासनतास बैठकीचे काम, व्यायामाचा अभाव,बदललेल्या आहार सवयी, फास्ट फूडचा अतिरिक्त वापर यामुळे विविध प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक व्याधीचे प्रमाण वाढत आहे. पाठीच्या मणक्याचे आजार, मानेचे आजार, कंबरदुखी ऍसिडिटी, थायराइड, हृदयाचे विकार इ. चे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे गोळ्या औषधे घेण्याचे प्रमाण वाढून त्याचे वाईट परिणाम आपल्या शरीरावर होत आहेत त्यामुळे यावर प्रभावी उपाय म्हणजे सु -जोक थेरेपी होय.यामध्ये आपल्या हाताच्या आणि पायाच्या तळव्यावरील विविध प्रेशर पॉईंट दाबून ही थेरेपी केली जाते. योग्य आहार आणि व्यायाम याबरोबरच सातत्याने ही थेरेपी केल्याने विविध व्याधीपासून मुक्ती मिळू शकते. यावेळी त्यांनी विविध प्रात्याक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे यांनी अध्यक्षीय समारोपात असे प्रतिपादन केले की कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी ही थेरेपी अत्यन्त उपयुक्त आहे. आपण सर्वांनी या थेरेपीचा आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग केला पाहिजे. ही थेरेपी आपल्या भारतातसाठी नवीन नाहो पुरातन भारतीय उपचार पद्धतीमध्ये याचा समावेश होता. परंतु काळाच्या ओघात काहीशी लुप्त झालेल्या या उपचार पद्धतीला पुन्हा नव्याने अंगीकरून आपले आरोग्य सांभाळने आवश्यक आहे.कार्यशाळेचे सूत्रसंचालन राष्टीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राणी जाधव तर आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. शिवाजी काकडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षिकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



# करचुंडीसह महाराष्ट्रातील गायनधारकांना ७/१२ द्या

बीड ।प्रतिनिधी

करचुंडी येथील गायनधारक गेल्या पंधरा दिवसा पासून गायरानाचा सातबारा मिळावा यासाठी धरणे आंदोलनाला बसले आहेत. याची दखल घेत ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रमुख दीपक केदार यांनी धरणे आंदोलन स्थळाला भेट दिली. त्यांनी बोलताना सांगितले करचुंडी सह महाराष्ट्रभर ज्या ज्या गावात गायरान धारक आहेत त्यांच्या नावाने सातबारा करा अन्यथा येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्व गायनधारकांनी मतदानावर बहिष्कार घालावा, त्याही पुढे बोलताना सांगितले जो कोणी मतदान मागायला येईल त्या नेत्याला गाव प्रवेश बंदी करा, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांतही गायरान हक्कासाठी तमाम करचुंडी सह महाराष्ट्रातला दलित बांधव संघर्ष करत आहे. सत्तेतल्या सरकारला भानावर आणण्यासाठी येणाऱ्या काळात मतदान वर बहिष्कार घालावा असे करचुंडी येथून इथून समस्त महाराष्ट्रातील गायरान धारकांना आव्हान केले आहे. संपूर्ण महाराष्ट्राची गायरान हक्क परिषद करचुडी येथे घेणार अशी घोषणाही त्यांनी केली.याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे नेते पुरुषोत्तम (गोटू )वीर,महाराष्ट्र अध्यक्ष विनोद भोळे,बालाजी जगतकर,जिल्हा अध्यक्ष नितीन सोनावणे,जिल्हा सचिव वसीम शेख, शहर युवा अध्यक्ष अविनाश वडमारे, अनिल वीर, गायरान धरणे आंदोलन आयोजक जयसिंग वीर यांच्यासह दीडशे गायरान धारक या प्रसंगी उपस्थित होते. जिल्हाधिकारी, पालकमंत्री, मुख्यमंत्री, यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. अद्यापही जिल्हा प्रशासनाने तहसील प्रशासनाने याआंदोलनाची दखल घेतली नाही किंवा जिल्ह्यातील खासदार, आमदार, भावी आमदार, माजी आमदार यांनी गायरानधारकांच्या आंदोलनास भेट दिली नाही अशी माहिती धरणे आंदोलकांनी दिली आहे.




अन्यथा गावा गावात मतदानावर बहिष्कार घालू - दीपक केदार

# अति. जिल्हा व सत्र न्यायालय माजलगाव च्या वकील संघात साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठया उत्साहात साजरी

बीड जिल्ह्यात नामांकित असलेल्या वकील संघात वकील बांधवानी मोठया उत्साहात साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी केली. या जयंती उत्सवाच्या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वकील संघाचे अध्यक्ष ऍड. बी. आर. डक साहेब हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा प्रमुख उपस्थिती म्हणून ऍड. एस. सी. शर्मा साहेब होते.

जयंती कार्यक्रम मध्ये प्रथम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक माजलगाव वकील संघाचे उपाध्यक्ष ऍड. एस. एस. कसबे यांनी केले यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्याबद्दल व सामाजिक योगदानावर यावेळी प्रकाश टाकला,त्या नंतर वकील संघातील विधिज्ञानी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले यामध्ये जेष्ठ विधिज्ञ ऍड. डोंगरदिवे साहेब, ऍड. एम. एन. जाधव साहेब यांनी मनोगत व्यक्त केले. ऍड. एस. सी. शर्मा साहेब यांनी मनोगत व्यक्त करत असताना त्यांनी स्वतः साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना १९६७ साली माजलगाव येथे ते एका सभेकरिता आले असता प्रत्यक्ष पाहीले असल्याचा अनुभव सांगितला. तर अध्यक्षीय समारोप ऍड. बी. आर. डक साहेब यांनी केला व आभार प्रदर्शन ऍड. डी. जी. जाधव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी वकील संघातील विधिज्ञ ऍड. व्ही. एस. जोशी, ऍड. वाय. बी. मुंडे, ऍड, गजमल साहेब, ऍड. डी. डी. ढाकणे, ऍड. तेरकर साहेब, ऍड. एस. यू. सोळंके, ऍड. जी. के. मिसाळ, ऍड. डि एच. कसबे , ऍड. विजय कुरे, ऍड. एम. एस. कुंभार, ऍड. व्ही. व्ही.देशमुख, ऍड. आर. आर. साबळे, ऍड. रवींद्र टाकणखार, ऍड. अर्जुन शिंदे, ऍड. टी. पी. रेडे, ऍड. नंदकिशोर खळगे,ऍड. चेतन सातपुते,ऍड. गाडेकर मॅडम, ऍड. बागल मॅडम, ऍड. कांचन भालेराव मॅडम, ऍड. वडमारे मॅडम व इतर सर्व सन्माननीय सिनिअर व जुनिअर वकील बांधव मोठ्या उत्साहात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.





बीड चे प्रसिद्ध वकील एडवोकेट किशोर टेकवानी साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्त सत्कार करून शुभेच्छा देताना समाज सेवक मूसा खान पठान दिसत आहेत.

## तरुणांनी नोकरीच्या मागे न धावता उद्योगाकडे वळावे

# डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये स्वयंरोजगार मेळाव्यात ६६५ जणांची नोंदणी

बीड (प्रतिनिधी)

स्वयंरोजगार मेळाव्यातून स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. नोकरीच्या मागे न धावता तरूणांनी उद्योगाकडे वळावे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयात स्वयंरोजगार मेळाव्याचे शुक्रवारी (दि.२) उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. या मेळाव्यात ६६५ जणांनी नोंदणी केली असून प्रातिनिधिक स्वरूपात ५ तरुणांना कर्ज मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप केले.व्यासपीठावर रा.काँ.चे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजयेंद्रू झा, शहर ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, मेळाव्याचे समन्वयक संकेत निकम, पोनि.शीतलकुमार बल्लाळ, एसबीआयचे मुख्य व्यवस्थापक विजय सेलवटकर, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी विजय काकड, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत, पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे, माजी नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, रवींद्र कदम, सय्यद इलियास, ड.विकास जोगदंड, बिभीषण लांडगे, अच्युतराव शेळके, जैतूल्ला खान सुनील झोडगे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, अल्पसंख्याक सेलचे शहराध्यक्ष माजेद कुरेशी, सरपंच अमोल बागलाने, शंकर चव्हाण, नितीन साखरे, विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, युवा नेते दत्तप्रसाद सानप आदींची उपस्थिती होती.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, बीड मतदारसंघातील व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी स्वयंरोजगार मेळावा ही सुवर्णसंधी आहे. या मेळाव्यातून फास्ट फूड, इडली-डोसा विक्री केंद्र, भाजीपाला विक्री, पर्यटन आदी व्यवसायांसाठी ८० ते ९५ टक्के बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात सबसिडी, व्याज परतावाचा लाभ मिळेल. यासाठी बँकांसह विविध आर्थिक विकास महामंडळांनी सर्वोतपरी सहकार्य केले आहे. या मेळाव्यातून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबध्द आहे, मेळाव्याला मिळणारा प्रतिसाद पाहता पुन्हा एकदा अशाच मेळाव्याचे आयोजन करू, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. प्रास्ताविक डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार ड.राजेंद्र राऊत यांनी मानले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, सर्व बँकांचे व्यवस्थापक, विविध महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, कर्मचारी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.




### शेकडो तरुणांच्या हाताला काम मिळेल-डॉ.सरिकाताई क्षीरसागर

शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आपण अनेकांना नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु सर्वांना नोकरी मिळणे शक्य नाही. आपल्या भागात अनेक तरुण रोजगाराच्या शोधात आहेत. अनेकांनी नोकरीसाठी स्थलांतर केले आहे. रोजगाराची निकड लक्षात घेता सर रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. यातून शेकडो तरुणांना रोजगार मिळेल, असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.



# युवा पत्रकार अमोल जाधव यांचा वाढदिवस विविध उपक्रमातून साजरा !

नाळवंडी ।प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज,निर्भिड पत्रकार अमोल जाधव यांचा २ ऑगस्ट रोजी वाढदिवस साजरा करण्यात आला,या वाढदिवसाच्या निमित्ताने एक महत्वपूर्ण आणि आदर्श उपक्रमातून हा वाढदिवस साजरा करण्यात आला,या वाढदिवसा दिनी बिड शहरापासून सात किलोमिटर अंतरावर असलेले गाव पाली यावी गावी असलेले इन्फंट इंडिया (आनंदग्राम) या ठिकाणी अनाथ विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनामध्ये लागत असलेली फळे वाटप करून तेथील चिमुकल्या सोबत वाढदिवस साजरा करण्यात आला.तसेच बिड शहरातील ढेकनमोह या गावी असलेले वंचितांच्या हक्काच असलेले पसायदान सेवा प्रकल्प या ठिकाणी अनाथ विद्यार्थ्यांना जीवनामध्ये घडले पाहिजेत.त्या निमित्ताने महत्वपूर्ण असलेले शालेय साहित्य वाटप करून, खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरा झाला,या पुढेही असेच कार्यक्रम साजरे होतील असे या वेळी अमोल जाधव यांनी म्हंटले आहे,या या कार्यक्रमाच्या प्रसंगी उपस्थित युवकनेता मसू जाधव,अमित ठोकळ,तेजस जाधव,अजय जाधव,आकाश जाधव,रोहन जाधव,अजय कानडे,अनिल लांडगे,आदित्य जाधव,निलेश रोकडे,आदित्य जाधव आदी उपस्थित होते.

# प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांचे गेवराई तालुक्यात जंगी स्वागत आणि सत्कार


तलवाडा (प्रतिनिधी)


मानवी हक्क अभियानाचे अध्यक्ष तथा जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांनी अमेरिकेच्या अभ्यास दौरा केला आहे. अभ्यास दौरा करून भारतामध्ये आल्यावर त्यांनी गेवराई तालुक्यातील तलवाडा गेवराई जातेगाव खेर्डावाडी सुर्डी या ठिकाणी भेट दिली असता त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आणि सत्कारही करण्यात आले. डॉ. मिलिंद आवाड हे नेहमीच दलित, वंचित, बहुजन, ऊसतोड कामगार, गायरान धारक, वेठबीगार अशा पिचलेल्या समाजाचे नेतृत्व विदेशामध्ये जाऊन करत असतात. गेल्या जुलै महिन्यात त्यांनी तब्बल एक महिन्याचा अमेरिकेचा अभ्यास दौरा केला आहे. अभ्यास दौरा करून आल्याबद्दल गेवराई तालुक्यातील तलवाडा, गेवराई, जातेगाव, खेर्डावाडी, टाकरवन, सुर्डी या ठिकाणी त्यांचे जोरदार स्वागत करून सत्कार करण्यात आला. त्या उद्देशाने समाजातील नव्या जुन्या कार्यकर्त्यांसोबत संघटनात्मक पातळीवर चर्चा करण्यात आली. येणाऱ्या काळामध्ये आपल्याला कशा पद्धतीने चळवळ पुढे घेऊन जाता येईल असेही ती म्हणाले. या कार्यक्रमाला बाबासाहेब थोरात, धोंडीबा हातागळे, सोनाजी कारके, मारुती भिसे बबन खंडागळे, रमेश जाधव, कचरू कांबळे, अंजीराम कांबळे, गणपत नाटकर काकुराम कांबळे संतोष हातागळे गोपीनाथ हातागळे विलास घोडे राधाकिसन गायकवाड दादा हातागळे बाळू शिंगारे गांवंजी हातागळे पांडू रोकडे आकाश वाघमारे मसू हातागळे अनिल हातागळे भैय्या कारके संतोष कारके नारायण कारके गुरुदत्त कारके विक्रम कारके विक्रम कारके कृष्णा कारके तात्या कुचेकर भिवाजी कारके सुनील कारके विकास कारके नितीन कारके वामन कारके काशिनाथ कारके सचिन करके रंजीत कारके सलीम भाई रखमाजी कारके पांडुरंग कारके बाबासाहेब वक्ते सुंदर वक्ते भगवान कारके शाखा अध्यक्ष संदीप भिसे राम भिसे भीमा भिसे सरपंच राजेश वाघमोडे

बाळासाहेब साबळे दशरथ देवकुळे राहुल भिसे संघर्ष ग्रुप चे उपअध्यक्ष धम्म त्रिभुवन सुभाष भिसे अजय भिसे ग्राम पंचायत सदस्य बळीराम भिसे लहुजी शक्ती सेनेचे युवा नेते विकास भिसे कुंडलिक भिसे विठ्ठल भिसे युवा नेते अभिजीत नितीन भिसे अनिल भिसे संतोष भिसे अंकुश भिसे ज्ञानेश्वर भिसे मधुकर भिसे खंडू भिसे चांगदेव भिसे आश्रुबा भिसे वसंत भिसे गणेश भिसे माऊली भिसे बाबासाहेब भिसे भानुदास कादे विजयमाला भिसे मिरा भिसे लताबाई भिसे सविता भिसे शारदा भिसे सुमन भिसे चंद्रकला भिसे महादेव भिसे बाळू भिसे आदि कार्यकर्ते उपस्थित होते.



# कपडे बदलल्यासारखे नेते आणि पक्ष बदलणार्यांनी एकनिष्ठांना शिकवू नये- खुर्शिद आलम





बीड ।प्रतिनिधी

**तीन लाख बीड शहर वासियांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून म्हणजेच डीपीसी मधून आठ कोटी रुपये मंजूर केले जाणार असल्याची माहिती मिळाली अन हसूच आवरेना झाले. पालकमंत्री महोदय, बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि माजी आ सय्यद सलीम वर्षभरापासून हेच तर सांगत अन मागत आहेत. तुम्ही श्रेयासाठी दोन वर्ष बीडच्या नागरिकांना वेठीस धरले अन न्यायालयात जायला भाग पाडले.**

**बीड शहराला पाणी पुरवठा करन्यासाठी तयार केलेल्या अटल अमृत योजनेत वीज जोडणीसाठी महावितरण विभागाने ३८ कोटींची थकबाकी भरण्याची अट नगर पालिकेला घातली. मात्र हे पैसे उपलब्ध नसल्याने डीपीसी मधून याची तरतूद करावी किंवा सरकारने विशेष बाब म्हणून हा निधी द्यावा यासाठी तीन अधिवेशनात आ संदीप क्षीरसागर यांनी हा प्रश्न मांडला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेली योजना केवळ वीज जोडणीमुळे सुरु होऊ शकलेली नाही हे देखील सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. धनूभावू आपण मंत्री आहात हे रेकॉर्ड आपल्याला सहज उपलब्ध होईल, एकदा सभागृहाचे रेकॉर्ड काढून बघा.**

आपण पालकमंत्री आहात, आमच्यापेक्षा सिनियर आहात, नेत्याशी एकनिष्ठ आहात, त्यामुळे आपल्याला विरोधीपक्ष नेतेपद असो कि मंत्रिपद मिळालं. त्यामुळे आपण बीड वासियांची अडचण दूर कराल असं वाटलं होत. पण काही कानफुक्या मुळे आपण बीडच्या लोकांना दोन वर्ष वेठीस धरलं. मग पाच दहा लाख खर्च करून या विषयावर न्यायालयात जावं लागलं.धनूभाऊ जर का पालकांनी दुर्लक्ष केल, मायबाप सरकारने कानाडोळा केला तर न्यायालयाची पायरी चढावीच लागते. नाहीतर पाच दहा लाख खर्च करून कोर्टात जायची कोणाला हौस नव्हती.

पालकमंत्री महोदय, कोरोनाच्या काळात राज्य सरकारने लोकप्रतिनिधी यांचा निधी अत्यावश्यक सेवेसाठी वर्ग केला होता, त्या जो आर मध्ये म्हटल्याप्रमाणे दुष्काळी परिस्थिती मध्ये डीपीसी चा निधी वापरता येतो, हे आ संदीप क्षीरसागर यांनी आपल्या समोर बैठकीत मांडले, नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारणे बीड जिल्हा दुष्काळी जाहीर केला, त्यानंतरच टंचाई या हेड खाली डीपीसी मधून निधी देण्याची मागणी केली, आपण तो निधी दिला मात्र तब्बल वर्ष दीड वर्ष उशिराने. आपण पालक आहात एवढा उशीर करून कस चालेल.

कोर्टाने हा नागरिकांच्या मूलभूत हक्काचा प्रश्न असल्याने तातडीने बैठक घेण्याचे सांगितले मात्र त्यातही आपण दोन दिवस बैठक पुढ ढकलली, आता दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक होणार असे आम्हाला कळले, धनूभाऊ योजनेला विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री महोदय निधी देऊ शकतात अन नगर विकास खाते देखील त्यांच्याकडेच आहे, मग फोनही उपमुख्यमंत्री यांच्याकडे बैठक कशासाठी हे अजूनही कळले नाही.

असो काहीही करा पण डीपीसी मधून दिला जाणारा निधी तातडीने द्या अन हो हाच प्रकार धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गवरील सर्व्हिस रोड, स्लिप रोड अन उड्डाणपूलाबाबत आहे बर का धनूभाऊ. कोणाच्या जमिनीचा भाव वाढावा हा उद्देश नाहीच आहे, आजपर्यंत या रस्त्यावर अपघात होऊन वीस लोक मृत्यूमुखी पडले आहेत, त्यामुळे हे काम होणे आवश्यक आहे, पण आपले काही पत्रक बहाद्दर लोक यात सुद्धा अरेतुरे ची भाषा करत आहेत, आम्हाला त्याच्याशी देणेघेणे नाही, पण अटल अमृत योजना सुरु करण्याचा विषय असो कि नॅशनल हायवे वरील स्लिप रोड चा विषय असो दोन्ही विषय जनतेच्या जिव्हाळ्याचे आहेत, यात राजकारण करू नका अन तातडीने हे विषय मार्गी लावा.

पालकमंत्री यांचे सध्या असलेले समर्थक म्हणतात की, बीडच्या आमदारांनी काहीच काम केले नाही. ठीक आहे, पण एक गोष्ट सर्वश्रुत आहे की, बीडचे आमदार संदीप क्षीरसागर हे जर पक्षाचे विचार सोडून जनतेशी गद्दारी करून सत्तेत सहभागी झाले असते तर सगळी कामे अगदी तातडीने पूर्ण झाली असती. पण पक्षाशी एकनिष्ठ राहिल्याने त्यांचे काम सातत्याने अडविले जाते हे सर्वांना माहीत आहे. परंतु लोकांना प्रामाणिक नेता आणि त्याची प्रामाणिक भूमिका आवडत असते. याचा प्रत्यय नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत आलेला आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड शहराध्यक्ष तथा बीड नगरपालिकेचे माजी सभापती खुर्शिद आलम यांनी म्हटले आहे.

**बर ते जाऊ द्या, जिल्हा वार्षिक योजनेतून म्हणजेच डीपीसी मधून पैसे द्यावेत ही मागणी आ क्षीरसागर यांनी जानेवारी २०२४ च्या बैठकीत केली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या दालनात देखील बैठक घेऊन समजावून सांगितले होते. पण आपण दुर्लक्ष केले. याचेही रेकॉर्ड उपलब्ध आहे, एकदा चेक करा.१० नोव्हेंबर २०२३ रोजच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून विशेष सवलती दिल्या जाव्यात असा निर्णय निर्गमित करण्यात आला होता. दरम्यान ज्याप्रकारे कोरोना काळात आमदार निधी, खासदार निधी, डीपीडीसी, शासनाचे विविध प्रकारचे निधी 'कोवीड रिलीफ' साठी वळविण्यात आले होते. त्याचप्रकारे बीड जिल्ह्यात दुष्काळ असल्याने व बीड शहराचा मुलभूत असलेला पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदारांचा, खासदरांचा निधी वळविण्यात यावा अशी मागणी डीपीडीसी बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी केली होती.**

# भावा गेवराईत एकच हवा, सुनील ठोसरच आमदार व्हावा!

## सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात सुनिल ठोसर यांचे अतुलनीय योगदान

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीचे वेध लागले असून लवकरच विधानसभा निवडणुकी च्या तारखे देखील निश्चित होतील. अशातच गेवराई मतदार संघामध्ये संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी प्रकर्षाने लढा उभा केलेला आहे. त्यामुळे गेवराई मतदार संघात बदल हा निश्चितच आहे. संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील म्हणतात, विधानसभा निवडणुकीत श्रीमंत मराठ्यांना पाडा त्याचमुळे सध्या तरी सामान्य गरीब शेतकरी मराठा कुटुंबातून आलेल्या सुनील ठोसर यांच्या नावाची चर्चा जनतेतून ऐकावयास मिळत आहे.

सुनील ठोसर हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असून ते सर्व परिचित असलेल्या गेवराई तालुक्यातील या छोट्याशा सिंदखेड गावचे रहिवासी आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन गेली अनेक वर्ष समाजकारणात सक्रिय असून त्यांच्या माध्यमातून कोविड १९ लॉक डाऊन काळामध्ये गोरगरीब जनतेपर्यंत राशन किट असो किंवा लॉकडाऊन काळामध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी पीक कर्ज पिक विमा शासनाच्या धोरणानुसार वाटप करण्यात यावी यासाठी त्यांनी केलेला संघर्ष, घरकुलधारकांना मिळणाऱ्या लाभाच्या रकमेसाठी वेठीस धरणाऱ्या कर्मचाऱ्यां वर कारवाई करण्यासाठी केलेले आंदोलन असो तसेच श्रावण बाळ इंदिरा गांधी संजय गांधी निराधार या गोरगरिबांच्या मानधना साठी सुरू करण्यात आलेल्या योजनांचा लाभ हा लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी व त्यांना पगार चालू करण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष, किंवा दिव्यांग बांधवांचे प्रश्न असो तशीच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात त्यांची अतुलनीय योगदान आहे असल्यामुळे तागायत गोरगरीब जनता ही विसरलेली नसून, सुनील ठोसर हे जनतेची सेवक म्हणूनच सर्व परिचित आहेत. सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लढणारा, शेतकरी, दिनदुबळ्यांसाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून न्याय मिळवून देणारा निस्वार्थी भावनेतून जनतेची सेवा करणारे व्यक्तिमत्व, तसेच राजकारण आणि समाजकारणाच्या माध्यमातून जनतेशी थेट संपर्क व त्यांच्याशी सात ला जाणारा संवाद यामुळे सर्व परिचित असणारे सुनील ठोसर हे गेवराई विधानसभा



मतदार संघातील जनतेच्या मनातील उमेदवार असलेल्या चर्चेस उधाण आले असल्यामुळे प्रस्थापितांचे धाबे दणाणले आहे. प्रस्थापितांची घराणेशाही मोडी स काढण्यासाठी सुनील ठोसर या नवख्या तरुण नेतृत्वास निवडून देण्याची चर्चा मतदारसंघातील जनतेतून जोरदार सुरू आहे. गेली अनेक वर्ष सामाजिक कार्य करत असताना सर्व जाती धर्मातील अठरापगड जातीच्या युवकांची फळी तयार करून अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराच्या विरुद्ध वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून गोरगरीब पीडित जनतेस न्याय देण्याचे काम सुनील ठोसर यांनी वेळोवेळी केले आहे. याच निस्वार्थी जनसेवेमुळे मतदार संघातील जनतेमध्ये त्यांच्या प्रति वेगळीच क्रेझ निर्माण झाली असून सुनील ठोसर हे गेवराई विधानसभा निवडणूक रिंगणात उतरणार असल्यामुळे व मतदार संघातील जनतेचा कौल पाहता प्रस्थापित राजकारणी, तसेच श्रीमंत मराठा, विरुद्ध सर्वसामान्य शेतकरी पुत्र, गरीब मराठा अशीच रंगतदार लढत गेवराई विधानसभा मतदारसंघात पहावयास मिळणार हे निश्चित आहे.

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण लढ्यात प्रकाशाने सहभागी होणारे व मनोज दादा जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक असल्याने तसेच संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील म्हणतात विधानसभा निवडणुकीत श्रीमंत मराठ्यांना पाडा त्यामुळे सध्या तरी सर्वसामान्य गरीब शेतकरी कुटुंबातून आलेल्या सुनील ठोसर यांच्याच नावाची जोरदार चर्चा जनतेतून ऐकवयास मिळत आहे. तसेच त्यांनी आजपर्यंत गोरगरीबांच्या सेवेत तत्पर राहून न्याय देण्यासाठी झटत आहेत. त्यामुळे अशा गोरगरीब जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच न्यायासाठी तडफदार नेतृत्व म्हणून सुनिल ठोसर यांना एकदा संधी देऊन गोरगरिबांच्या सेवेत दाखल करावे अशी चर्चा सध्या सुरू आहे.

# शिवसैनिकांनो, मला आमदार नाही तर बीडच्या जनतेला आमदार बनवण्यासाठी कामाला लागा- अनिलदादा जगताप

## शिवसेना कार्यालयात पदनियुक्ती तथा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न

बीड ।प्रतिनिधी

गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि सामान्य जनतेसाठी अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या कार्यपद्धतीला प्रभावित होऊन शिवसेना पक्षात प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. एकनाथ शिंदे साहेब आणि डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली शिवसेनेचे मार्गक्रमन यशस्वीपणे सुरु आहे. त्यामुळे आपल्याला जनतेच्या भल्यासाठी पक्ष संघटना मजबूत करून येणाऱ्या विधानसभेला आपले नेते शिंदे साहेब यांचे हात बळकट करावे लागणार आहेत तरच महाराष्ट्रावर पुन्हा एकदा भगवा फडकला जाईल असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, शिवसैनिकांनो, यंदा विधानसभेला मला आमदार बनवण्यासाठी नाही तर बीड मतदार संघातील प्रत्येक माणसाला आमदार बनवण्यासाठी आणि सामान्यांच्या घरात सत्ता पोहचवण्यासाठी दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करा. पूर्ण ताकदीने कामाला लागा, यंदाच्या



निवडणुकीत अनिल जगताप नाही तर बीडचा सामान्य घरातला प्रत्येक माणूस आमदार झाला पाहिजे. असं वक्तव्य शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी शिवसेना पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळ्या दरम्यान केले.

काल दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळा पार पडला. यामध्ये नव्याने लखन जगताप यांचा शिवसेनेत प्रवेश घेण्यात आला. याबरोबरच विकास लांडगे- विभाग प्रमुख, रणजीत बुंदीले – विभाग प्रमुख, ऋषीकेश जोगदंड-शहर सहसंघटक, अक्षय काशिद- उपशहर प्रमुख यांचा प्रवेश घेऊन नियुक्तीपत्र देत पदनियुक्ती करण्यात आली तर शिवसेना तालुका कार्यकारणीवर रजनीकांत उर्फ गणेश श्रीमंत मस्के- तालुका संघटक, ज्ञानेश्वर नागोराव ढास- तालुका सह सचिव, ढास दादासाहेब त्रिंबक – उपतालुका प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. याबरोबरच लिंबागणेश जि. प. सर्कलमधील ढवळे सुरेश दगडु – विभाग प्रमुख, सुर्वे सदाशिव उपविभागप्रमुख, जाधव अशोक श्रीपती – सर्कलप्रमुख, घोलप सुनिल रावसाहेब – सर्कलप्रमुख, वायभट कृष्णा मनोहर –उपसर्कलप्रमुख, वळे दत्ता ज्ञानोबा – उपसर्कल प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकिशोर पिंगळे यांनी केले तर सुनील सुरवसे जिल्हा संघटक बीड, संतोष जाधव उप जिल्हाप्रमुख, मकरंद उबाळे तालुका प्रमुख आणि गणेश मस्के तालुका संघटक बीड यांनी आपले मनोगत व्यक्त करत येत्या विधानसभेला पक्ष संघटना मजबुतीसाठी आणि मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू अशी ग्वाही दिली. अनिलदादा जगताप यांनी आपल्या अध्यक्षीय भाषानात शिवसैनिकांना संबोधित केले. बीड मतदार संघात काम करण्याचे दिशा धोरण ठरवून दिले. पक्ष संघटन वाढवण्यासाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले आणि विधानसभाच नाहीतर येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीला शिवसेनाचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांना पूर्ण ताकदीने काम करण्याचे आवाहन केले.



# ऊसतोड मजुरी करणारा मुलगा झाला आरोग्य सेवक अधिकारी

## भिवाजी थोरात हे आरोग्य सेवक परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला

प्रतिनिधी, सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी या गावातील भिवाजी थोरात यांची मेहनत नक्कीच प्रेरणादायी आहे. अत्यंत गरीब व हालाखीची परिस्थिती असताना त्यांचे वडील यांनी ऊसतोड कामगार व मजुरी करून त्यांना शिकवले व नंतर भिवाजी थोरात यांनी पण आपल्या वडिलांसोबत ऊसतोड कामगार म्हणून काम केले व काम करत असताना त्यांनी अभ्यास चालूच ठेवला व अत्यंत मेहनत व जिद्दीने अभ्यास करून त्यांनी महसूल विभागात कोतवाल या पदावर बाजी मारली व नंतर अभ्यास करत त्यांनी आरोग्य सेवक या परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळवले व समाजातील युवकांसमोर एक आदर्श निर्माण केला त्यामुळे समाजातील व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी माझी सरपंच महादेव थोरात माजी उपसरपंच श्रावण थोरात मानवी हक्क अभियान चे कार्याध्यक्ष बी के थोरात, दगडू लोखंडे,लक्ष्मण थोरात, लक्ष्मण खंडागळे,बाबुराव कोळेकर, श्याम थोरात, बाबासाहेब थोरात, धर्मा मोरे, बालाजी लोखंडे, सुनिल थोरात, आकाश लोखंडे,आबासाहेब थोरात,भगवान लोखंडे, प्रभाकर गायकवाड, भगवान मोरे, सुधाकर लोखंडे, सुभाष लोखंडे, तुकाराम गायकवाड, बालाजी थोरात, शिवाजी थोरात,विजय थोरात, मुक्तीराम गायकवाड, प्रकाश थोरात, तानाजी थोरात, गोविंद लोखंडे, जोतिबा लोखंडे, नितीन थोरात, सुनील सोनवणे, कल्याण मोरे, शिवाजी मोरे यांची उपस्थिती होती.

# अखेर दासखेड,कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरु:- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारतीसाठी २ कोटी ६३ लाख आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थाना साठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून सर्व सोयींनी युक्त आरोग्य केंद्र बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून बांधकाम पूर्ण झालेले असतानाही शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. मात्र पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांची हेळसांड होत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत यासाठी दि.१५ ऑगस्ट आगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.सरिता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी घेत जिल्हा आरोग्य आधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासुन दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला असुन रूग्णांची गैरसोय दूर झाली असुन पाटोदा येथे उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही.



दासखेड येथील भुमिपुत्र कृष्णा जाधव हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू अधिकारी असुन एकनाथ शिंदे आरोग्यमंत्री असताना कृष्णा जाधव ओ.एस.डी. म्हणून काम पहात होते.त्यांच्या प्रयत्नांमुळे दासखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात येऊन २ कोटी ६३ लाख खर्चून ईमारत बांधण्यात आली मात्र २ वर्षांपासून आरोग्य सुविधा सुरू नव्हती.आता आरोग्य सुविधा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील रूग्णांची हेळसांड थांबणार आहे. याठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नाही तेवढ्या त्रुटी आरोग्य विभागाने दुर कराव्यात.

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तब्बल २ कोटी ६३ लाग रूपये खर्चून मुख्य ईमारत सर्व सोयींनी युक्त बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते.संबधित प्रकरणी १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर डॉ.सारिका हजारे सहसंचालक आरोग्यसेवा ( प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी निवेदनाची दखल घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या सुचना दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवा सुरू करण्यात आली असुन वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे कार्यरत असुन रूग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.दासखेड आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत.क्लार्क ,एएनएम, सफाई कामगार अशा स्वरूपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन भरण्यात आलेला असुन दि.१ ऑगस्ट पासुन दोन्ही केंद्रातील बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आलेला असुन पुढील सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील.



# अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराची जयंती झाली पाहिजे–डॉ. मिलिंद आवाड

दुचाकी रॅलीने वेधले लक्ष

माजलगाव ।प्रतिनिधी

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी दलित, वंचित यांचे प्रश्न, गिरणी कामगारांचे प्रश्न आपल्या लेखणीतून मांडण्याचे काम केले. त्यामुळे त्यांच्या विचाराची जयंती झाली पाहिजे असे आवाहन मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलींद आवाड यांनी केले.

मानवी हक्क अभियानच्या वतीने दि. १ ऑगस्ट रोजी वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थांनी आ. डी. के. देशमुख, आमदार प्रकाश सोळंके, भाजपा नेते मोहन जगताप, नारायण डक, रामा राठोड, दत्ता डाके, धम्मानंद साळवे, नारायण गोले, दयानंद स्वामी, जीवन राठोड, अभय होके, रंजित कांबळे, कचरू खळगे, शेख मंजुर, शरद यादव, सहाल चाउस, अरूण इंगळे, तुकाराम येवले, सभापती जयदत्त

नरवडे, नितीन नाईकनवरे, सुरेश सावळे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले जयसिंग सोळंके, नानासाहेव घोडके, उमेश मोगरेकर, नानाभाउ शिंदे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. मिलींद आवाड

## मानवी हक्क अभियानची अभिवादन सभा

म्हणाले की, जो माणुस गुलाम आहे, जो माणुस लाचार आहे, शोषित आहे, त्या माणसाला त्याच्या हक्काची जोपर्यंत जाणिव होत नाही तोपर्यंत तो पेटून उठणार नाही. आजच्या युवा पिढीने अण्णाभाउंचा आदर्शवाद आपल्या जिवनात अंगिकारावा असेही ते

म्हणाले. दुचाकी रॅलीचे देखिल आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अण्णाभाउ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दुचाकी रॅली सभास्थळी गेली. रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात युवकांचा सहभाग होता. अभिवादन सभेस मोठ्या प्रमाणात समाजबांधव उपस्थित होते. सुत्रसंचालन वावासाहेव थोरात, सुमंत गायकवाड यांनी तर आभार संदिप वाघमारे यांनी मानले.

# सामान्य पत्रकारांकडेही मतांचे गठ्ठे आहेत – वसंत मुंडे

# पत्रकार संवाद यात्रेच्या पहिल्या टप्प्याचा शिर्डी येथे समारोप

अहमदनगर ।प्रतिनिधी

पत्रकार समाजाच्या प्रश्नांसाठी व्यवस्थेशी झगडत राहितो. आपल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतो.मात्र आता न्याय मागण्यां साठी महाराष्ट्रातील तमाम पत्रकारांचा एकत्रित बुलंद आवाज करण्याचा प्रयत्न करणार आहोत. सरकारने संवेदनशील होऊन पत्रकारांना न्याय द्यावा. अन्यथा प्रकारांकडे लेखणीसोबतच मतांची देखील ताकद आहे. एका मतदारसंघात संघात वीस पत्रकारांनी वैयक्तीक पातळीवर प्रत्येकीती ५०० मत दिली तर राज्यात तीस लाख मतांचा गठ्ठा होईल. मग ही मत कोणी बघणार की नाही? पत्रकारांच्या मतांची गरज आहे की नाही?असा प्रश्न करत सरकारने पत्रकारांच्या मागण्यांसाठी तात्काळ निर्णय घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रमुख वसंत मुंडे यांनी केले .

शिर्डी येथे २८ जुलै २०२४ रोजी दिक्षाभूमी ते नागपूर पत्रकार संवाद यात्रेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप झाला.नागपूर वर्धा ,अमरावती, अकोला, धुळे,जळगाव, शेगाव या मार्गे श्रीक्षेत्र शिर्डी येथे २ ऑगस्ट रोजी दाखल झाली. यावेळी स्थानिक पत्रकारांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री वसंतराव मुंडे यांच्यासह प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी,मुंबई विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे,अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे, उत्तर जिल्हाध्यक्ष सोमनाथ काळे, उत्तर विभागीय सचिव अनिल रहाणे उपस्थित होते.यावेळी संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र मुंबईचे संस्थापक अध्यक्ष किसन भाऊ हासे व मनसे पदाधिकारी यांची पाठिंबा दिला.यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की,साई बाबानी श्रद्धा आणि सबुरीची शिकवण जगाला दिली. अशा संत नगरीत यात्रेचा समारोप होत आहे. नागपूर येथील दिक्षाभूमी येथून संवाद यात्रेला प्रारंभ झाला. त्यावेळी मला मनात थोडी सांशकता होती.मात्र जसा संवाद यात्रेचा प्रवास सुरू झाला तसे वर्धा, अमरावती, अकोला, शेगाव, जळगाव, धुळे ते आज शिर्डी या प्रवासा दरम्यान विविध तालुके छोटी छोटी गावे येथील पत्रकारांच्या विविध संघटनांनी उस्फूर्तपणे पाठबळ दिले. एवढेच नव्हे तर विविध लोकप्रतिनिधी, विविध पक्षांचे नेते, सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते,सामान्य जनता यांनी संवाद यात्रेचे स्वतः हून उस्फूर्त स्वागत करत जाहीर पाठिंबा दिला. या भागातून प्रवास करत असताना पत्रकारांनी त्यांच्या वास्तव समस्या जेव्हा समोर मांडल्या तेव्हा मी केवळ २० प्रमुख समस्याना सोबत घेऊन निघालो होतो. आता या मागण्यांमध्ये मुंबईला जाई पर्यंत किती वाढ होईल हे आज सांगू शकत नाही.याचाच अर्थ पत्रकारांच्या समस्या होत्या आणि आहेत.केवळ या समस्यांना वाचा कोणी फोडायची ? जगाचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांना आपलेच प्रश्न कुणापुढे मांडावेत ? हा प्रश्न पडला होता.हे वास्तव या संवाद यात्रेच्या माध्यमातून समोर येत आहे.आज पर्यंत लोकशाही मार्गाने संविधानिक मार्गाने आम्ही सरकारकडे न्याय हक्काच्या मागण्या मागितल्या.यातील काही मागण्यांना सरकारने न्याय दिला.मात्र त्यामध्ये जाचक अटी टाकल्या.यामुळे त्या सुविधांचा लाभ सुलभपणे होत नाही.आता आमची मागणी एवढीच आहे पत्रकारांना अधीस्वीकृती सहज मिळावी आणि ज्येष्ठ पत्रकारांना वयाच्या साठव्या वर्षीच तात्काळ शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सन्मान पेन्शन योजना मिळावी. यासह विविध न्याय मागण्यांना सरकारने २० ऑगस्ट रोजी पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमाच्या व्यासपीठावर येऊन पत्रकार देखील लाडकी बहीण, लाडका भाऊ याप्रमाणे लाडका पत्रकार देखील आहे हे सिद्ध करून पत्रकारांच्या हिताचे निर्णय शासन स्तरावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी जाहीर करावेत.पत्रकारांकडे लेखणी बरोबरच मतांचीही शक्ती आहे याचा विचार सरकारने करावा. पत्रकार व त्यांच्या संपर्कातील मतदार एकत्रित केले तर एक सामान्य पत्रकार वैयक्तिक



पातळीवर पाचशे मत देऊ शकतो त्यामुळे एका मतदारसंघात दहा हजार आणि राज्यात तीस लाख मतांचा गठ्ठा होईल मग ही मत पाहिजेत का नाही ? हे सांगण्याची वेळ आली आहे.यामध्ये आम्हाला कसलेही राजकारण करायचे नाही. तो आमचा पिंड ही नाही. आम्ही आमच्या न्याय हक्कांच्या मागण्यासाठी प्रामाणिकपणे लढत आहोत, एवढीच आमची या संवाद यात्रे मागील प्रमुख भूमिका आहे. असे स्पष्टीकरण प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिले.




## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत प्रभाग क्र: २ मध्ये २५ दिवस चालू असलेल्या कॅम्प मधील लाभार्थी महिलेना भरलेल्या अर्जाची पावती देण्यात आली.

**बीड सविस्तर वृत्त असे की, प्रभाग क्र.२ मध्ये माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड नगरपरिषद च्या माजी उपनगराध्यक्षा स्मितातार्इ विष्णू वाघमारे यांनी दिनांक:– ९/७/२०२४ रोजी सदरील कॅमची सुरुवात केली होती.**

**जवळजवळ २५ दिवसाच्या कालावधीमध्ये चालू असलेल्या कॅम्पमध्ये शेकडो महिलांचे अर्ज भरून त्यांच्या अर्जाची पावतीच्या आज वाटप दैनिक लोकप्रश्नचे माननीय संपादक दिलीप भाऊ ख्रिस्ती तसेच सुवर्ण जयंती विभागाचे थिटे सर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी या योजनेसाठी माझी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू भैया वाघमारे सनी वाघमारे सह लाभार्थी महिलांनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमाला थिटे सरांनी शासनामार्फत दिले जाणाऱ्या विविध योजनेचे महिलांना मार्गदर्शन केले.**

# सरकारकडून नव्या योजनांचा सपाटा; पण 'जुन्या'चे अनुदान केव्हा? : दत्ता वाकसे

## घरकुल, विहीर, सिंचन साहित्याचे अनुदान रखडले; शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याणकारी नवीन योजनांचा धडाका सुरू असल्याचे दिसून येते, तर दुसरीकडे जुन्या योजनेअंतर्गतचे घरकुल, विहीर, ठिबक संच यांसह अन्य साहित्याचे अनुदान मागील तीन ते चार महिन्यांपासून रखडले आहे. त्यामुळे या जुन्या योजनेअंतर्गतचे अनुदान केव्हा मिळणार? असं सवाल शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केला आहे

जिल्ह्यातील हजारो लाभार्थीचे लक्ष लागून आहे.

पात्र लाभार्थीचे जीवनमान उंचावणे, त्यांना मदतीचा आर्थिक हात देणे, अर्थसाहाय्य करणे, विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे यांसह अन्य उद्देश साध्य करण्यासाठी शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये गत एका महिन्यात लाडकी बहीण,लाडका भाऊ, वयोश्री, मोफत वीज, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, तीर्थदर्शन यांसह अन्य काही योजनांची भर पडली आहे. नवीन योजनांचा लाभ



घेण्यासाठी जिल्ह्यात सध्या लाभार्थी कडून आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, ऑनलाइन / ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी धावपळ सुरू असल्याचे दिसून येते. दुसरीकडे मोदी आवास योजनेअंतर्गतचे अनुदान मागील दोन महिन्यांपासून रखडले आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १० हजार २४४ घरकुलांचे उद्दिष्ट आहे. दोन महिन्यांपासून शासनाकडून अनुदानच मिळाले नसल्याने लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले. परंतु राज्य सरकारकडून व केंद्र सरकारकडून.नवीन योजना आणण्याचा सपाटा चालू असून तीन महिन्यापासून रोजगार हमीच्या विहिरी शेततळे फळबाग लागवड याचे पैसे आणखीही. लाभधारकाच्या खात्यामध्ये पडलेले नाहीत परंतु आता असे म्हणण्याची वेळ आलेली आहे की नवीन योजनाचा सपाटा चालू परंतु जुन्याचे अनुदान कधी देणार? त्यामुळे तात्काळ राज्य सरकारने व केंद्र सरकारने गेल्या तीन महिन्यापासून रोजगार हमीच्या विहिरी शेततळे फळबागा. यासह विविध योजनांचे गेल्या तीन महिन्यापासून पैसे.थकलेले असताना नवीन योजना आणून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार जनतेची फसवणूक करत आहे असेही वाकसे यांनी म्हटले आहे



# लोकनेते मा.बदामराव पंडित हेच गेवराईचे आमदार होणार – मनोज डोंगरे, साहील शेख

बीड ।प्रतिनिधी

अवघ्या दोन महिन्यावर आलेल्या विधानसभा निवडणुकीत गेवराई मतदारसंघात लोकनेते मा.मंत्री बदामराव पंडित यांचाच बोलबाला असून शिवसेना उबाठा पक्षाकडून त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. गोरगरिबांच्या मदतीला अहोरात्र धावून जाणारे , जिल्हा परिषद पंचायत समिती, तहसील नगरपरिषद कार्यालतील गोरगरिबांच्या आडलेल्या कामास मार्गी लावणारे लोक नेतृत्व म्हणजे सर्वांचे लाडके नेते बदामराव पंडित होय. आपल्या गेवराई तालुक्यातील जनतेच्या सुखदुःखात सहभागी असणारे सर्व जाती धर्मातील लोकांना अविरत मदत करणारे लोकसेवक अशी ख्याती आबाची आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत परिवर्तनाची लाट येणार असून शिवसेनेची मशाल हाती घेऊन गेवराईची जनता मा. बदामराव पंडित यांना विधानसभेत पाठवणार आहे. बदामराव पंडित समर्थक कार्यकर्त्यांनी आजपासूनच कामाला लागुन गावनिहाय निवडणुकीची आखणी करावी बुथ प्रतिनिधी नेमुन तेथील लोकांच्या समस्या आबाच्या कानावर घालून त्याचा निपटारा करावा.आबाच्या सर्व समर्थकात उत्साहाचे वातावरण असून विरोधक कितीही असोत यावेळी येणार तर फक्त बदामराव पंडित असाच दृढनिश्चय कार्यकर्त्यांनी केला असून गेवराई मतदार संघात हीच लोकभावना आहे. आबाचा दांडगा जनसंपर्क गेवराई मतदारसंघातील लोकांना नावासह ओळखणारे, मा. मंत्री असल्याने विकासकांना गती मिळण्यासाठी गेवराई मतदारसंघातील जनतेने गेवराईचा विकास करण्यासाठी लोकसेवक मा. मंत्री बदामराव पंडित यांना भरघोस मतांनी विजयी करून विधानसभेत पाठवावे अशी विनंती बदामराव पंडित यांचे कट्टर समर्थक शिवसैनिक मनोज डोंगरे व साहील शेख यांनी केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT